पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०७

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/०२/२०२२** वेळ - **दुपारी ३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती ची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १८/०२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. मा.सभापती, विधी समिती या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनातून सभा संचलित करण्यात आलेली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा. सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे- सभापती**
२. मा.सुनिता हेमंत तापकीर
३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
४. मा.संगीता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडण्यात आली.

सुचक - संगीता भोंडवे अनुमोदक - संगीता ताम्हाणे

खालील मान्यवरांचे नुकतेच दुःखद निधन झाले आहे. त्यांना आजच्या विधी समिती सभेत श्रद्धांजली वाहण्यात यावी.

१) भारतरत्न गानसम्राज्ञी, पार्श्वगायिका लात मंगेशकर यांचे निधन.

२) मावळ लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार गजानन बाबर यांचे निधन.

३) शिवसेना जेष्ठ नेते माजी मंत्री सुधीर जोशी यांचे निधन.

४) बजाज उद्योग समुहाचे प्रमुख व जेष्ठ उद्योगपती पद्मभुषण राहुल बजाज यांचे निधन.

५) पिंपरी चिंचवड महापालिका नगरसेविका अश्विनी चिंचवडे यांचे पती गजानन चिंचवडे यांचे निधन.

६) जेष्ठ सिने अभिनेते रमेश देव यांचे निधन.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

----------

**उपस्थिती सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. ११ मधील स्वामी विवेकानंद मैदानावरील वाढीव प्रकाश व्यवस्था करणे या कामातून काम करून घेणेस व स्थळ बदलास मान्यता मिळणेबाबत.

----------

अ) मा.विधी समिती सभा (**कार्यपत्रिका क्रमांक ०६**) दि.०४/०२/२०२२ चा सभावृतांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १८/०२/२०२२ विभाग - पाणीपुरवठा विभाग

सुचक - मा. संगिता भोंडवे अनुमोदक - मा. संगीता ताम्हाणे

संदर्भ - मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.जशुके/पापु/९७/२०२२, दि.१०/०२/२०२२.

विषय- पवना थेट पाईप लाईन प्रकल्पामधील साहित्य सांभाळण्यासाठी सिक्युरिटी सर्व्हीसेसचे देयक निविदा क्रमांक - १६/१/२०२०-२१ या कामामधून देणेबाबत.

विषय क्र.०१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १८/०२/२०२२ विभाग - फ क्षेत्रिय विद्युत

सुचक - मा.संगीता ताम्हाणे अनुमोदक - मा.संगिता भोंडवे

संदर्भ - मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/जा/२/४०/२०२२, दि. १७/०२/२०२२.

मा. अतिरिक्त आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. ११ मधील स्वामी विवेकानंद मैदानावरील वाढीव प्रकाश व्यवस्था करणे.हे काम के.के.इंजिनिअरींग सर्व्हीसेस यांना आदेशान्वये क्र.वि.मुका/५/कावि/४९७/२०२१ दिनांक २५/०६/२०२१ रोजी १८ महिने कालावधीकरिता देण्यात आलेली आहेत. सदर कामामध्ये १६ मीटर उंचीचे ५ हायमास्टचा समावेश आहे. सदर स्वामी विवेकानंद मैदानावरील वाढीव प्रकाश व्यवस्था करणे या मूळ कामाच्या ठिकाणी ३ हायमास्ट बसविणे शक्य आहे. उर्वरित १६ मीटर उंचीचे २ हायमास्ट व इतर विद्युत साहित्यांची बचत अंदाजे र.रु इतकी २०,००,०००/- मधून प्रभाग क्र ११ पूर्णानगर येथील सेक्टर नं १८ CDC मधील मोकळी जागा क्र. ४ पर्यटन केंद्राच्या ठिकाणी १६ मीटर उंचीचे २ हायमास्ट व रोहीत्रसंच बसविणे शक्य आहे. तरी प्रभाग क्र.११ मधील स्वामी विवेकानंद मैदानावरील वाढीव प्रकाश व्यवस्था करणे या कामातून प्रभाग क्र.११ पूर्णानगर येथील सेक्टर नं.१८ CDC मधील मोकळी जागा क्र.४ पर्यटन केंद्र या ठिकाणी १६ मीटर उंचीचे २ हायमास्ट व रोहीत्रसंच बसविणे हे काम करुन घेणेस व स्थळ बदल करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/७६/२०२२
दिनांक : २४/०२/२०२२

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना